वर्ष- १२ | अंक- ११ | मुंबई, मंगळवार,२७ जानेवारी २०२६ ते २ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

लग्न सोहळ्यात मानानं मिरवावे ५ अस्सल मराठी दागिने

3 → पोलीस यंत्रणा मुजोर राजकीय नेत्यांसमोर हतबल

सायबर गुन्हेगारांचा नवा डाव मोबाईलमधील ॲपमुळे १० लाखांची लूट, बँक → 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

नराधमाने मुख्याध्यापिकांच्या केबिनमध्ये पाय ठेवला, चिमुकली भेदरुन आई-वडिलांच्या मागे लपली

बदलापूर। बदलापूरमध्ये पुन्हा एकदा शाळेतील एका लहान मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका चार वर्षाच्या मुलीसोबत स्कूल व्हॅनमध्ये हे कृत्य घडलं आहे. बदलापूर पश्चिमेला असणाऱ्या एका नामांकित खासगी शाळेत हा प्रकार घडला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपी वाहन चालकाला ताब्यात घेतलं असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या घटनेमुळे बदलापूरमध्ये पुन्हा एकदा संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे मुलीचे पालक सुरुवातीला शाळेत गेले तेव्हा मुख्याधापिकेनं बस चालकाची बाजू घेतली. यापूर्वीही बदलापूरमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणावर शाळा प्रशासनाने पडदा टाकण्याचा प्रयत्न केला होता. तसाच प्रकार यावेळीही घडला. शाळेच्या मुख्याधापिकेनं दाद न दिल्यामुळे पालकांनी पोलिसांकडे धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन चालकाला अटक केली.

चिमुरडी घाबरून पालकांच्या मागे लपली

प्राथमिक माहितीनुसार, ज्या लहान मुलीसोबत चालकानं हे संतापजनक कृत्य केलं, ती नर्सरीत शिकत होती. मुलीचे पालक तिला घेऊन शाळेत गेले, त्यावेळी मुख्याधापिकेने बस ड्रायव्हरला शाळेत बोलावून घेतलं. बसचालक शाळेत आल्यानं तरमुख्याधापिकांच्या केबिनमध्ये शिरलातेव्हा तिथे असलेली चार वर्षाची चिमुरडी घाबरली. ती आपल्या पालकांच्या पाठीमागे लपली. यावरुन पालकांना मुलीच्या मनस्थितीचा अंदाज आला आणि त्यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठलं. या प्रकरणात राज्य सरकारने निर्देश देऊनही बसमध्ये महिला अटेंडंट नसल्याचा प्रकार समोर आला. त्यामुळे आता बस चालकासह शाळेवरही कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

नेमकी घटना काय?

बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी शाळेत चार वर्षांची चिमुकली शिकत होती. ती नेहमीप्रमाणे दुपारी 12.30 वाजेपर्यंत स्कूलव्हॅनमधून घरी न परतल्यामुळे तिच्या आईने व्हॅन चालकाकडे फोन करून विचारणा केली. त्यानंतर साधारण दीड तासानंतर चिमुकली घरी आली. ती अत्यंत भेदरलेल्या आणि घाबरलेल्या अवस्थेत होती. तिच्या आईने तिच्याकडे विचारणा केली असता तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. आरोपीने चिमुकलीच्या गुप्तांगाला हात लावल्याचं तिने आपल्या आईला सांगितलं. हे ऐकून पालकांच्या पायाखालची जमीनच सरकली. चिमुकलीच्या पालकांनी तत्काळ पोलीस स्टेशनमध्ये धाव घेत, पोलिसांनी व्हॅन चालकाला अटक केली असून गुन्हा दाखल केला आहे.



विद्यार्थ्याला काळंनिळं पडेपर्यंत मारलं

प्रश्नाचं उत्तर न दिल्याने बुलढाण्यातील शिक्षकाची क्रूरता

बुलढाणा। बुलढाणा जिल्ह्यातील एका शिक्षकाने विद्यार्थ्याला अमानुषपणे मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. जिल्ह्यातील पिंपळगाव राजा येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकणाऱ्या १० वर्षीय पवन नारायण इंगळे या विद्यार्थ्याला शिक्षकाने लोखंडी पट्टीने मारहाण केली. या संदर्भात विद्यार्थ्याच्या वडिलांनी काल रात्री पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यानंतर आज त्या शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विद्यार्थी शाळेतून घरी आल्यावर त्याची आजी त्याचा गणवेश काढत होती. त्यावेळी तो मुलगा वेदनेने विव्हळू लागला. आजीने शर्ट काढताच तिला धक्काच बसला. तिला मुलाच्या पाठीवर, हातावर आणि पायावर काळे-निळे वळ उठल्याचे दिसले. आजीने ही बाब त्या मुलाच्या वडिलांना सांगितली. मुलाच्या शरीरावरील जखमा पाहून वडीलही हादरले. वडिलांनी



विचारले असता मुलाने सांगितले की, शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही म्हणून त्यांनी लोखंडी पट्टीने त्याला बेदम मारले.

शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल

शिक्षकाच्या या क्रूरतेची तक्रार वडिलांनी पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यात केली. त्यानंतर विद्यार्थ्याला वैद्यकीय तपासणीसाठी खामगाव शहरातील रुग्णालयात नेण्यात आले. पिंपळगाव राजा पोलीस ठाण्याचे अधिकारी भागवत मुळीक यांनी माहिती दिली की, वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर आज पोलिसांनी शिक्षकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि चाइल्ड केअर ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

मुंबईत वाहन चोरीचं मोठं रॅकेट

एका वर्षाला ६४,०१२ दुचाकी वाहने चोरीस, तर थेट 'या' राज्यात होते विक्री

मुंबई । वाहन चोरी ही समस्या केवळ मुंबई शहरापुरती मर्यादित राहिलेली नाही. अंधेरी, जोगेश्वरी, मालाडसारख्या परिसरांबरोबरच उपनगरांमध्येही दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले आहे. वसई-विरार परिसरातही अशा घटना समोर आल्या असून, नागरिक हैराण झाले आहेत. मुंबईत गेल्या एका वर्षात वाहन चोरीचे एकूण २,२९९ गुन्हे नोंदवले गेले आहेत. यापैकी सुमारे निम्म्या म्हणजे १,३५७ गुन्ह्यांचीच उकल होऊ शकली आहे. याचा अर्थ असा की अनेक वाहनांचे अजूनही काहीही ठावठिकाणा नाही. दररोज सरासरी 5 ते 6 वाहने चोरीला जात असल्याने ही समस्या गंभीर बनत चालली आहे. पण ही वाहने जातात कुठे? या प्रश्नाच उत्तर चकित करणारं आहे.

गुन्हेगारीचे आकडे काय सांगतात ?

मुंबई पोलिसांच्या माहितीनुसार, मागील वर्षात शहरात एकूण ६४,०१२ गुन्हे नोंद झाले, त्यापैकी ५१,५५९ गुन्ह्यांची उकल झाली. मात्र वाहन चोरीच्या बाबतीत यशाचे प्रमाण कमी आहे. २०२४ मध्ये वाहन चोरीचे २,५८९ गुन्हे नोंदले गेले होते. त्याच्या तुलनेत थोडी घट झाली असली, तरी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली आहे असे म्हणता येणार नाही.

भंगार आणि सोशल मीडियाचा गैरवापर

काही टोळ्या चोरी केलेल्या दुचाकींचे सुटे भाग वेगळे करून ते भंगारात किंवा गॅरेजमध्ये स्वस्तात विकतात. तर काही जण भंगारातील कागदपत्रांचा वापर करून चोरीच्या गाड्या पुन्हा विक्रीस काढतात. सोशल मीडियावरही अशा फसव्या जाहिराती दिसून येत आहेत.

कडक कारवाई करण्याची गरज...

वाहन चोरीचे वाढते प्रकार पाहता, स्वतंत्र तपास पथक, कडक कारवाई आणि नागरिकांची जागरूकता यांची नितांत गरज आहे. अन्यथा मुंबईकरांची वाहने नेमकी कुठे जात आहेत, हा प्रश्न कायम अनुत्तरितच राहील.



चोरीची वाहने कुठे जातात?

चोरी झालेल्या बहुतांश गाड्या मुंबईबाहेर नेल्या जात असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या गाड्या गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि कर्नाटकसारख्या राज्यांमध्ये विकल्या जातात. काही वेळा या चोरीच्या वाहनांचा वापर इतर गुन्ह्यांसाठीही केला जातो, ज्यामुळे गुन्ह्यांची साखळी वाढते. पूर्वी वाहन चोरीसाठी स्वतंत्र पथक होते. मात्र २०१८ मध्ये हे पथक बंद करून मालमत्ता कक्षात विलीन करण्यात आले. त्यामुळे वाहन चोरीच्या तपासासाठी खास लक्ष देणारी यंत्रणा कमी पडत असल्याचे चित्र आहे. एखादी टोळी पकडली गेली, तर १० ते १५ गुन्ह्यांची उकल होते, हे पोलिस कारवाईतून स्पष्ट झाले आहे.



पन्नासपर्यंत आकडे न लिहिला आल्याने ४ वर्षाच्या मुलीला केलं ठार

संतापलेल्या बापाचं कृत्य, रिमान्डमध्ये घेताच दिली कबुली

पोलिस तपास काय सांगतो?

फरिदाबाद पोलिसांनी नराधम बापाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी केल्यानंतर मुलीला मारण्याचे कारण त्याने सांगितले. मुलीचे आईवडील एका खाजगी कंपनीत कामाला आहेत. आई कामाला गेल्यानंतर तिचे वडील तिची काळजी घेण्यासाठी घरी थांबल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'आरोपीविरोधात केस दाखल करण्यात आली असून पुढील चौकशीसाठी आरोपीला रिमान्डमध्ये घेण्यात आलं आहे. मुलीचे पोस्टमार्टम करुन तिचे शरीर कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



बदलापुर। पोटची मुलं ही आई-वडिलांसाठी जीव की प्राण असतात. मात्र अशा काही घटना घडतात की या नात्याला काळिमा फासला जातो. अशीच एक भयानक घटना समोर आली आहे. मुलीने होमवर्क करताना केलेल्या चुकांमुळे रागावलेल्या एका बापाने त्या मुलीला इतकं मारलं की यामध्ये त्या चार वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. चिमुकलीच्या आईनेच याविषयी पोलिसांत तक्रार दाखल केली. यानंतर त्या नराधम बापाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

पन्नासपर्यंत आकडे लिहिता न आल्याचा राग

हरियाणाच्या फरिदाबादमधील २१ जानेवारीची ही घटना असून कृष्णा जैस्वाल असं या ३१ वर्षीय नराधम बापाचं नाव आहे. त्याने आपल्या चार वर्षाच्या चिमुकलीला पन्नासपर्यंतचे आकडे लिहिण्यास सांगितले. मात्र ते लिहिणं मुलीला जमलं नाही. यामुळे कृष्णाला राग आला आणि त्याने मुलीला मारलं. हा मार इतका भयानक होता की यामध्ये त्या मुलीचा मृत्यू झाला. यावेळी त्या मुलीची आई घरात उपस्थित नसल्याने नराधम बापाला रोखणारं कोणीही नव्हतं. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जैस्वाल कुटुंब मूळ उत्तरप्रदेशातील सोनभद्रा जिल्ह्यातील असून ते फरिदाबाद इथं भाड्याच्या घरात राहतात.

कामावरुन घरी परतल्यानंतर आईला काय दिसलं ?

चिमुकलीची आई सायंकाळी कामावरुन घरी परतल्यानंतर तिला धक्काच बसला. घरात तिला आपली मुलगी दिसली, मात्र त्या मुलीच्या शरीरात प्राण नव्हते. यानंतर लगेचच तिने पोलिसांना फोन केला. पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी ते चिमुकले प्राणहिन शरीर आपल्या ताब्यात घेतले.

सखी

लग्नसोहळ्यात मानानं मिरवावे ५ अस्सल मराठी दागिने

भारतीय लग्न म्हटलं की नटणं- मुरडणं आलंच. वऱ्हाडापासून नवरीपर्यंत, पोशाखापासून दागिन्यांपर्यंत प्रत्येक घटकात एक वेगळाच रॉयल टच दिसतो. साडीची निवड असो, मेकअप असो किंवा केसांची स्टाइल. सगळ्यात महत्त्वाची शोभा वाढवतात ती पारंपरिक दागिन्यांनी. जर आपल्याही घरी लग्न असेल तर काठाच्या आणि खणाच्या साडीवर कोणते पारंपरिक दागिने घालायला हवे जाणून घ्या.



मोहनमाळ

मोहनमाळ हा एक पारंपरिक मराठमोळा सोन्याचा दागिना आहे. सोन्याच्या तारेमध्ये जोडलेला गोल मण्यांमध्ये असतो. ही माळ एक, दोन, तीन किंवा त्याहून जास्त पदरांमध्ये असते.



कोल्हापूरी साज

महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि सगळ्यांचा आवडता दागिना कोल्हापुरी साज. पारंपरिक महाराष्ट्रीयन दागिना आहे.



चिंचपेटी

चिंचपेटी हा पारंपरिक दागिना आहे. गळ्याभोवती बसणारा घट्ट असा चोकर प्रकार. हा सोन्याच्या चिंचेच्या पानासारख्या पेट्या आणि मोत्यांनी बनवतात.



ठुशी

ठुशी ही गोल मण्यांच्या माळेने बनवली जाते. राजेशाही आणि मनमोहक लुक मिळतो. आता ठुशीच्या बांगड्या, मंगळसूत्र यांसारखे विविध प्रकार उपलब्ध आहेत.



नथ

नथ हा पारंपरिक दागिना आहे. जो स्त्रियांच्या सौंदर्यात भर घालतो. महाराष्ट्रात नथ हे सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. लग्न समारंभात किंवा सणासुदीला परिधान केली जाते.

ऑफिस वेअरसाठी पुढच्या गळ्याच्या ५ स्टायलिश ब्लाऊज डिझाइन्स



रोज ऑफिसला जाताना आज काय घालू असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. डेली रुटीनमधला कन्फ्युजनचा भाग. आपल्या वॉडरोबमध्ये अनेक कपडे, साड्या असतात. पण कधी ब्लाउज फिटिंग बसत नाही तर कधी मॅचिंग होत नाही. दरवेळी नवीन ब्लाउज शिवणे देखील शक्य नसतं.

हिवाळा असला की आपल्या कपड्यांचे सिलेक्शन देखील वेगळे असते. आपण फुल हातांचे किंवा थंडी लागणार नाही असे कपडे निवडतो. या काळात स्टायलिश दिसणं थोडं आव्हानात्मक असते. पण या ५ पद्धतीचे फॅन्सी ब्लाउज शिवल्यास तुमच्या सौंदर्यात भर पडेल.

स्टायलिश लूकसाठी आपण व्ही- नेकलाइन असलेला ब्लाउज शिवू शकतात. यात फुल स्लीव्हज देखील शिवता येतील. जे आपल्याला लूकला अधिक आकर्षित करेल. जर आपल्याला सुंदर आणि शाही लूक हवा असेल तर आपण चुडीदार पद्धतीचे ब्लाउज शिवू शकतो. हे दिसायला खूप सुंदर असते.

क्लासी लूकसाठी हॉल्टर नेकलाइन ब्लाउज डिझाइन फार सुंदर आहे. यात खांद्यावर कटवर्क असतो. ज्यामुळे साधा ब्लाउज्जदेखील छान दिसतो.

फुल स्लीव्हज नको असतील तर आणि पफ स्टाईल ब्लाउज शिवू शकतो. हे दिसायला खूप फॅन्सी असतात. बलून स्लीव्हज खूप स्टायलिश असतात. त्यामुळे आपल्याला कम्फर्टेबल वाटते. आपली साडी शिफॉन किंवा जॉर्जेटची असेल तर स्टेटमेंट लूक मिळतो.



फॅशनच्या दुनियेत नेहमीच काहीतरी नवीन ट्रेंड येत असतो. पण पारंपरिकतेला मॉडर्न टच सोबत खास जोड देण्याची कला ही खूप कमी गोष्टींमध्ये दिसते. कानात बुगडी घालणे, हा आपल्या संस्कृतीचा आणि सौंदर्याचा अविभाज्य भाग आहे. बुगडीमुळे चेहऱ्याला एक वेगळीच शोभा येते आणि पारंपरिक लुक पूर्ण होतो.

बदलत्या काळानुसार, बुगडीला एक नवा, स्टायलिश आणि तरीही पारंपरिकतेचा फील देणारा पर्याय उपलब्ध झाला आहे, ते म्हणजे 'नीडल ईअररिंग कफ्स' आता बुगडीऐवजी नीडल ईअररिंग कफ घालण्याचा नवा ट्रेंड फारच लोकप्रिय होत आहे.

आकर्षक, यूनिक, हलके वजनाचे आणि कानाला वेगळेपण देणारे हे इअरकफ कोणत्याही एथनिक किंवा पारंपरिक लूकला एकदम रॉयल आणि मॉडर्न टच देतात.

नीडल ईअररिंग कफ्स हे कानातले डिझाईन्स बुगडीइतकेच सुंदर आणि आकर्षक दिसतात, पण त्यांची स्टाईल अधिक मॉडर्न आणि हटके असते. हे तुम्हाला पारंपरिकतेचा अनुभव देण्यासोबतच एक क्लासी आणि ट्रेंडी लूक देतात. आता जुन्या बुगड्यांच्या ऐवजी, तुम्ही या नीडल ईअररिंग कफ्सच्या मदतीने तुमच्या पारंपरिक पोषाखाला एक नवा आणि स्टायलिश ट्विस्ट देऊ शकता. हे कानातले डिझाईन्स तुमच्या सौंदर्यात भर टाकून तुम्हाला नक्कीच इतरांपेक्षा वेगळे आणि आकर्षक बनवतील.



बुगडीऐवजी आला नीडल इअरकफचा नवा ट्रेंड

लग्न, सण, पारंपरिक कार्यक्रम किंवा प्रत्येक खास प्रसंगासाठी नीडल ईअररिंग कफ हा एक परफेक्ट पर्याय आहे. त्यामुळे झुमके, बुगडी किंवा मोठमोठे जड दागिने न घालता देखील तुम्ही सुंदर आणि ग्रेसफुल दिसू शकता. नीडल ईअररिंग कफ मोत्यांनी आणि चमकदार स्टोन्सनी सजवलेले असतात, जे तुम्हाला रॉयल आणि एलिगंट लुक देतात. पार्टीवेअर किंवा खास प्रसंगांसाठी हे उत्तम पर्याय आहेत.

मोरपंखी डिझाईन असलेले नीडल कफ पारंपरिक भारतीय अलंकारांना एक आधुनिक टच देतात. हे तुमच्या एथनिक लुकला चार चाँद लावतात. गोल्डन पारंपरिक डिझाईन्स असलेले हे क्लासिक नीडल कफ कोणत्याही पारंपरिक साडी किंवा लेहेंग्यावर खूप सुंदर दिसतात. यांची डिझाईन साधी पण आकर्षक असते.

जर तुम्हांला रंगीबेरंगी कुंदन वर्क आवडत असेल तर तुम्ही कुंदन वर्क असणारे ट्रेंडी नीडल एअरकफ एअररिंग घालू शकता.

नऊवारी साडीवर पारंपरिक मराठमोळा लूक हवा असेल तर आपण चंद्रकोर असलेले पारंपरिक नीडल एअरकफ नक्की घालून आपल्या लुकला एका खास रॉयल टच देऊ शकता.

पारंपरिक डिझाईन्समध्ये कलश, मोरपंखी अशा वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर, रेखीव डिझाईन्स पाहायला मिळतील.

कोणत्या साडीवर कोणता दागिना चांगला दिसतो? ५ टिप्स, साडीनुसार 'असा' ठरवा दागिना

एकच एक प्रकारचे दागिने तुम्ही सगळ्याच प्रकारच्या साड्यांवर घालत असाल तर त्यामुळे तुम्ही खूप साचेबद्ध दिसाल. शिवाय तुमची साडी, तुमचा लूक आणि दागिनेही उठून दिसणार नाहीत.

म्हणूनच नेहमीच साडीच्या प्रकारानुसार दागिन्यांची निवड करायला हवी. त्यासाठीच या काही टिप्स पाहा आणि साडीनुसार कोणते दागिने घालायचे ते ठरवा..

खण, कॉटन, लीनन या प्रकारातल्या साड्या असतील तर त्यावर ऑक्सिडाईज ज्वेलरी घाला.

सिल्क, सेमी सिल्क प्रकारातल्या साड्या असतील तर त्यावर सोन्याचे किंवा गोल्डन पॉलिशचे दागिने घाला.

जर तुमची साडी ऑर्गेंझा प्रकारातली असेल तर त्यावर खड्यांचे, स्टोनचे दागिने घाला.

प्लेन साडी असेल किंवा नाजुक डिझाईन असणारी फ्रेश, फिक्या रंगाची साडी असेल तर मोत्याचे दागिने छान दिसतील.

जर नऊवारी नेसणार असाल तर तिच्यावर हमखास सोन्याचे पारंपरिक दागिने घाला.





साडीची चमक गेली आहे का? या टिप्स नक्कीच ट्राय करा

भारतीय महिलांना साड्या घालायला आवडतात. म्हणून, त्यांना त्यांच्या कपाटात भरपूर साड्या हव्या असतात, परंतु जसजशी साडी जुनी होऊ लागते तसतसे तिची चमक कमी होऊ लागते. जर तुमच्या साडीची चमक कमी झाली असेल, तर आज आपण तिची चमक टिकवून ठेवण्यासाठी काही टिप्स पाहणार आहोत.

साडीची चमक टिकवून ठेवण्यासाठी टिप्स -

जर साडीची चमक कमी होऊ लागली असेल, तर ती धुताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. जेव्हा साडी धुता तेव्हा थोड्या प्रमाणात डिटर्जंट वापरा आणि नेहमी सौम्य डिटर्जंट वापरा. सौम्य द्रव किंवा सौम्य डिटर्जंट साडीला फिकट होण्यापासून रोखेल आणि ती पूर्णपणे स्वच्छ करेल.

साडी थंड पाण्याने धुवा-

तसेच, साडी धुताना थंड पाण्याचा वापर करा. गरम पाण्यामुळे साडीची चमक कमी होऊ शकते. साडी वाळवताना, ती थेट सूर्यप्रकाशात येऊ देऊ नका. तीव्र सूर्यप्रकाशामुळे तिची चमक कमी होऊ शकते. म्हणून, साडी सावलीच्या ठिकाणी वाळवा.

तसेच, कपाटात नॅप्थालीन बॉल्स किंवा सिलिका जेल पॅकेट्स ठेवा. यामुळे साडीची चमक टिकून राहण्यास मदत होईल आणि दुर्गंधी देखील कमी होईल. नॅप्थालीन बॉल्स आणि सिलिका जेल पॅकेट्स विशेषतः रेशीम आणि रेशमी साड्यांचे संरक्षण करण्यास मदत करतील.

साडी इस्त्री करताना या गोष्टी लक्षात ठेवा

जेव्हा साडी धुवून वाळवाल आणि नंतर ती इस्त्री कराल तेव्हा विशेषतः काळजी घ्यावी लागेल. जर साडी रेशमी किंवा नाजूक कापडापासून बनलेली असेल, तर नेहमी कमी इस्त्री तापमान वापरा. साडी इस्त्री करताना कागदाचा देखील वापर करू शकता. साडी कागदावर दाबल्याने तिची चमक कमी होणार नाही आणि कापड टिकून राहील.

थंडी स्पेशल सुपरस्टायलिश गर कपड्यांचे ८ ट्रेंडी प्रकार



१. केबल निट पॅटर्न : मोठ्या धाग्याने विणलेला पॅटर्न स्वेटर, कार्डिगन आणि स्कार्फसाठी खूप वापरला जातो. दिसायला क्लासिक, उबदार आणि भारी कपड्यांसारखा दिसतो.

२. रिब्ड निट पॅटर्न : रिब्ड निट पॅटर्न अंगाला फिट होणाऱ्या स्वेटर, टॉप आणि टर्टलनेकमध्ये दिसतात. हिवाळ्यात स्टायलिश तसेच आरामदायक पर्याय.

३. हेरिंगबोन पॅटर्न : कोट, ओव्हरकोट आणि जॅकेटमध्ये हा पॅटर्न दिसतो. थोडा शार्प, फॉर्मल आणि एलिगंट लूक देणारे डिझाईन आहे.

४. प्लेड / चेक्स पॅटर्न : शाल, जॅकेट, कोट आणि वूलन स्कर्टमध्ये सर्वात लोकप्रिय हा पॅटर्न असतो. विंटर फॅशनचे हे नेहमीचे आणि ट्रेंडी पॅटर्न आहेत.

५. हाउंडटूथ पॅटर्न : क्लासिक आणि स्टायलिश असा हा डिझाइन कोट, ब्लेझर आणि वूलन पँट्समध्ये आवडीने वापरला जातो.

६. फेअर आयल पॅटर्न : अनेक रंगांचे पारंपारिक निटिंग डिझाईन. ख्रिसमस स्वेटर, फुल-स्लीव्ह स्वेटर आणि कार्डिगनमध्ये खूप लोकप्रिय प्रकार असून दिसतातही सुंदर.

७. डायमंड आर्गाइल पॅटर्न : डायमंड आकाराचे जाळीसारखे डिझाईन पुलओव्हर, स्वेटर-वेस्ट आणि मोज्यांमध्ये मिळणारा हा पॅटर्न आहे.

८. वूलन एम्ब्रॉयडरी पॅटर्न : शाल, स्वेटर आणि कुर्ती-कोटांवर सूक्ष्म धाग्यांची भरतकाम केलेली स्टायलिश डिझाइन असते. पारंपारिक आणि मॉडर्न दोन्हीमध्ये दिसते.



महागड्या हँड बॅग्स खरेदी करताना ही खबरदारी घ्या

आजकाल ब्रँडेड कपड्यांच्या जोडीने ब्रँडेड ॲक्सेसरीजही वापरण्याबाबत महिला जास्त दक्ष होत आहेत. हातातली पर्स किंवा हँड बॅग, शूज पर्यंत सर्व काही एखाद्या प्रसिद्ध ब्रँडचेच वापरण्याकडे आजकाल वाढता कल दिसून येत आहे.

महिलांच्या बाबतीत म्हणायचे झाले, तर घराबाहेर पडताना आवर्जून बरोबर घेतली जाणारी वस्तू म्हणजे हँड बॅग, किंवा पर्स. हँड बॅग, हे आत केवळ पैसे किंवा इतर आवश्यक वस्तू ठेवण्याचे साधन राहिले नसून आता ते 'स्टाइल स्टेटमेन्ट' झाले आहे. म्हणूनच सुप्रसिद्ध देशी विदेशी ब्रँडस्च्या हँड बॅग्सना बाजारामधे मोठी मागणी आहे. पण एखादी महागडी हँड बॅग खरेदी करताना आपण 'डुप्लिकेट' बॅग तर खरेदी करत नाही ना, याबद्दल जागरूक असणे गरजेचे आहे. आजकाल बाजारामध्ये अनेक मोठमोठ्या ब्रँडस्ची नावे वापरून नकली माल विकला जात आहे. आपली फसवणूक होऊ नये याकरिता आपण खबरदारी घेणे आवश्यक आहे. आपण निवडलेली बॅग 'ओरिजीनल' आहे की 'फेक' आहे हे कळणे काहीसे कठीणच म्हणावे लागेल. पण ज्या व्यक्तीला हँड बॅग्सची चांगली माहिती आहे, त्याला हा फरक कळल्यावाचून राहणार नाही.



संपादकीय

पोलीस यंत्रणा मुजोर राजकीय नेत्यांसमोर हतबल



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



राज्याचे मुख्यमंत्री इतके हतबल आहेत की ते फौजदारी गुन्ह्याखाली फरार असलेल्या एका मंत्र्यांच्या मुलाविरोधात काहीच बोलत नाहीत?, मंत्र्यांची मुले गुन्हा करून मोकाट फिरतात, ते मंत्र्यांच्या संपर्कात राहतात, परंतु पोलिसांना सापडत नाहीत? तरीही मंत्री खुशाल मंत्रिमंडळात बसतात?, या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही?, असे रोखठोक प्रश्न कुठल्या विरोधकांनी नाही तर, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांनी उपस्थित केले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे कॅबिनेट मंत्री भरत गोगवले यांचा मुलगा विकास गोगावले याच्या अटकपूर्व जामीन याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. या सुनावणीवेळी तब्बल ५० हून अधिक दिवस फरार असलेल्या विकास गोगावलेच्या प्रकरणात न्यायमूर्तींनी हे वक्तव्य केले. गेल्या महिन्यात अर्थात २ डिसेंबर २०२५ ला राज्यात नगरपरिषदांच्या निवडणुका झाल्या. त्यादिवशी महाड नगरपरिषद निवडणुकीचे मतदान सुरू असताना प्रभाग क्र. २ मध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते. या राड्यात मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले व पुतण्या महेश गोगावले यांच्यावर अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करणे तसेच त्यांच्यावर रिव्हॉल्व्हर रोखण्याचे आरोप झाले होते. या आरोपाखाली पोलिसांनी विकास गोगावलेवर कलम ३०७ (जीवे मारण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्याचप्रमाणे माजी आमदार माणिक जगताप यांचे पुत्र आणि अजित पवार गटाचे नेते श्रीयांश जगताप यांच्यावरही महाड पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच विकास व महेश गोगावले हे दोघेही फरार झाले होते. या काळात पोलिसांनी दोघांच्या अटकेसाठी किती प्रयत्न केले हे कळण्यास मार्ग नाही, परंतु, दोघांनीही सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. हा जामीन अर्ज २३ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयाने फेटाळून लावला होता. कायदेशीर प्रक्रियेनुसार दोघांनीही पोलिसांसमोर हजर राहून जामीन मिळवणे अपेक्षित होते, मात्र तसे न करता त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. हे प्रकरण न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल पीठासमोर येताच न्यायमूर्तींनी राज्य सरकारसह पोलिसांना चांगलेच धारेवर धरले.

महेश गोगावलेने १४ जानेवारी २०२६ ला नवी मुंबईतील एका नोटरीसमोर हजर राहून प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी केली होती. त्याचा उल्लेख करताना पोलीस रेकॉर्डनुसार फरार असलेला आरोपी नोटरीसमोर हजर होऊ शकतो, तर तो पोलिसांना कसा सापडत नाही? यावरून पोलिसांचा कल आरोपींना वाचवण्याकडे आहे का?, असा प्रश्न न्यायमूर्तींनी केला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहणे गरजेचे आहे. दबाव तुमच्यावर असेल, माज्यावर नाही. ठरवून दिलेल्या वेळेपर्यंत विकास गोगावले शरण न आल्यास मी माझे आदेश जारी करणार, असा इशारा दिल्यानंतर शुक्रवारी विकास गोगावलेसोबत महाड राडा प्रकरणातील इतर सर्व फरार आरोपी महाड पोलिसांना शरण आले. भलेही हे दोघे पोलिसांसमोर शरण आले असले, तरी या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने राज्य सरकार आणि पोलीस यंत्रणेचे अक्षरशः वाभाडे काढले हे बरेच झाले म्हणा. मागच्या काही महिन्यांपासून राज्यात महिलांवरील अत्याचार, ड्रग्ज तस्करी, कोयता गँग आदी गुन्हेगारी कारवायांवरून राज्य सरकार सातत्याने टीकेचे धनी ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांसह आपल्याच पक्षातील प्रतिस्पर्धींना वेसण घालण्यात माहीर असले, तरी गृहखाते सांभाळताना त्यांच्या कार्यक्षमतेचा प्रभाव अजूनही दिसून आलेला नाही. सत्तेविरोधी भूमिका घेतली की, दारावर पोलीस, ईडी, सीबीआय, आयटी अथवा इतर तपास यंत्रणांची टकटक झालीच म्हणून समजा. परंतु सत्ताधारी पक्षातील मंत्री असो किंवा त्याच्या नातेवाईकाने कायदा धाब्यावर बसवून कुठलाही गुन्हा करावा आणि लपून बसावे. गेल्याच आठवड्यात ब्रिटनचे नागरिक असलेले डॉ. संग्राम पाटील यांना मुंबई पोलिसांनी विमानतळावरून पकडून आणत चौकशी केली होती. सत्ताधार्यांविषयी टिप्पणी केल्याच्या आरोपाखाली त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. चौकशीला पूर्ण सहकार्य करूनही त्यांच्यावरील लुकआऊट सर्क्युलर पोलिसांनी मागे न घेतल्याने डॉ. संग्राम पाटील यांना ब्रिटनला परतता आले नाही. इमिग्रेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांना विमानतळावरून माघारी धाडले. अशा रितीने नातेवाईकांच्या भेटीसाठी आलेले डॉ. पाटील भारतातच अडकले आहेत. सध्या त्यांनीही न्यायालयात धाव घेत दाद मागितली आहे.

याउलट काही महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचा जमीन घोटाळा समोर आला होता. या प्रकरणात पार्थ पवार यांच्या भागीदारांवर, सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई सोडा. परंतु, एक साधी तक्रारही पार्थ पवारांच्या नावाने पोलिसांनी नोंदवली नाही. याचप्रकारे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगरमधील विट्स हॉटेलच्या लिलाव प्रक्रियेत गैरव्यवहार केल्याचा आरोप झाला होता. हे प्रकरणही असेच हवेत विरले. माजी मंत्री तानाजी सावंत यांनी रागाने घरातून निघालेल्या मुलाला रोखण्यासाठी पुण्यातील सर्व शासकीय यंत्रणा अवघ्या काही तासांत गरागरा फिरवली होती. विकास गोगावलेच्या जागी कुणी साधा कार्यकर्ता असता तर, कधीच गजाआड झाला असता. सर्वसामान्यांच्या कुठल्याही प्रकरणात तत्परतेने पो लीस चौकशी वा तपास झाल्याचे आठवत नाही. मंत्री महोदय आपल्या मुलाशी संपर्क साधून त्याला शरण यायला सांगतायत, अशी माहिती राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाला दिली होती. त्यानुसार विकास आणि महेश गोगावले दोघेही पोलिसांवर उपकार केल्याच्या थाटात शरण आले. याचाच अर्थ पोलिसांना शेवटपर्यंत त्यांना अटक करता आलीच नाही. यावरून केवळ मुख्यमंत्रीच नाही, तर राज्याची पोलीस यंत्रणा मुजोर राजकीय नेत्यांसमोर हतबल झाल्याचे विदारक चित्र राज्यातील जनतेने या निमित्ताने पाहिले आहे.

तांदूळनिर्यातीला वेसण

भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

व्यवस्थेवर उपाय कधी?



महाराष्ट्रात सध्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ खरोखरच लाभार्थींनाच मिळत आहे ना, याची 'ई-केवायसी' (ऑनलाईनद्वारे स्वत:ची ओळख कागदपत्रांद्वारे पडताळून देणे) करून पडताळणी करण्याचे काम चालू आहे. खोटी माहिती देऊन पात्र नसलेल्या लाखो महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले. काही शासकीय महिला कर्मचारी आणि पुरुष यांनीही खोटी माहिती देऊन या योजनेचा अपलाभ घेतला. त्यामुळे सरकारला कोट्यवधी रुपयांची आर्थिक हानी झाली. यातून धडा घेऊन डिसेंबर २०२५चा हप्ता 'ई-केवायसी'नंतरच देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. 'ज्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा अपलाभ घेतला, त्यांच्यावर गुन्हा नोंद करून पैसे वसूल केले जातील', असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. प्रत्यक्षात कोणती कारवाई झाली, हे अद्याप पुढे आलेले नाही. १२ सहस्र ९०० शासकीय महिला कर्मचार्यांनी या योजनेचा अपलाभ घेतला होता आणि ८६ लाख अपात्र नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे सरकारला १५० कोटी रुपयांहून अधिक भुर्दंड बसला. त्यामुळेच या लाभार्थींची 'ई-केवायसी' चालू आहे. तांत्रिक त्रुटी वा अज्ञान यांमुळे शासकीय योजनेचा अपलाभ हा काही प्रमाणात होऊ शकतो, हे समजून घेण्यासारखे आहे; परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात जेव्हा योजनेचा अपलाभ होतो, तेव्हा तो ठरवून केलेला भ्रष्टाचार असतो. शासकीय योजनेतील हा भ्रष्टाचार केवळ फसवर्णायाने खोटी माहिती दिली, यावरून होत नाही, तर प्रशासकीय पातळीवर लाच घेऊन अशा चुकीच्या गोष्टी चालवून घेतल्या जातात, तेव्हाच असे प्रकार होतात. हा भ्रष्टाचार केवळ 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'पुरता मर्यादित नाही, तर अशा प्रकारे बहुतांश शासकीय योजनेचा अपलाभ होऊन सरकारला जो कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड बसतो, याचा हिशोब लावणे कठीण होईल. वर्ष २०१७-१८ च्या कालावधीमध्ये महाराष्ट्रात खोट्या क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचा प्रकार उघड झाला. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना सरकारी नोकरीमध्ये ५ टक्के आरक्षण दिले जाते. याचा अपलाभ घेऊन काही क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पैसे घेऊन खोट्या कागदपत्रांच्या आधारे क्रीडा प्रमाणपत्रे दिली. याविषयीच्या तक्रारी आल्यावर हळूहळू सरकारच्या हा घोटाळा लक्षात आला; परंतु तोपर्यंत सरकारच्या १८ हून अधिक विभागांमध्ये हे उमेदवार कार्यरतही झाले होते. अशा प्रकारे खोट्या क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी प्राप्त केलेल्यांच्या विरोधात सध्या 'महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणा'मध्ये खटले चालू आहेत, म्हणजे खोट्या कागदपत्रांच्या आधारे भरती झाली, हा एक घोटाळा आणि तो निस्तरण्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेत होणारा व्यय अन् या प्रकरणांच्या सुनावण्यांसाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सातत्याने उपस्थित रहावे लागणे, अशा विविध प्रकारे सरकारलाच फटका बसत आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' असो किंवा खोट्या क्रीडा प्रमाणपत्रांचा घोटाळा असो, हे दोन्ही प्रशासनाकरता लाजिरवाणे आहेत. खासगी आस्थापनात असे प्रकार घडले असते, तर ते करणाऱ्यांना हाकलून लावण्यात येईल. सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून होणारा भ्रष्टाचार हा सरकारची अकार्यक्षमता आणि अनास्था न्यून करणारी आहेच; परंतु सर्वसामान्य नागरिकांसाठीही डोकेदुखी आहे. महाराष्ट्रात मागील २ वर्षांत जे १ सहस्र २३७ बांगलादेशी घुसखोर सापडले, त्यांच्याकडे जन्मप्रमाणपत्र, आधारकार्ड, शिधापत्रिका, वाहन परवाना, पॅनकार्ड ही कागदपत्रे मोठ्या प्रमाणात आढळून आली. शासकीय स्तरावरील भ्रष्टाचार आणि अनास्था यांविना हे शक्यच नाही. वर्ष २०१३ मध्ये तर अमरावती येथे भारतीय क्रिकेट संघाचे तत्कालीन कप्तान महेंद्रसिंह धोनी, गुजरातचे त्या वेळचे मुख्यमंत्री आणि आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाच्या शिधापत्रिका बनवण्यात आल्या होत्या. हा प्रकार तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी सरकारला पाठवलेल्या अहवालातून उघड झाला होता. सरकारकडून बांगलादेशी घुसखोरांचा शोध तर चालू आहे; परंतु त्यांना खोटी प्रमाणपत्रे देण्यामध्ये प्रशासनातील कोणते अधिकारी आणि कर्मचारी यांचा हात आहे, याचाही शोध सरकारने घ्यायला हवा. खोटी क्रीडा प्रमाणपत्रे किंवा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' यांतील अपहार हा सरकारच्या आर्थिक हानीपुरता मर्यादित होता; मात्र बांगलादेशी घुसखोरांना खोटी प्रमाणपत्रे देण्याचा प्रकार भ्रष्टाचार, आर्थिक हानी यांसह राष्ट्रविरोधी आहे, याचा अन्वेषण यंत्रणा आणि सरकार यांनी गांभीर्याने विचार करायला हवा. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी चालू असल्याचे प्रकार उघड झाल्यानंतरही काही रकमेसाठी त्यांना खोटी कागदपत्रे देणारे देशद्रोही राज्यासह देशाशी निष्ठा ठेवू शकत नाहीत. बांगलादेशी घुसखोरांनी भलेही खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे बनवली आहेत, तरीही राष्ट्रापुढील धोका लक्षात घेऊन प्रशासनातील उच्च अधिकारी आणि प्रमाणपत्र देणाऱ्या कार्यालयाशी संबंधित अधिकारी यांनी सतर्कपणे त्यांची पडताळणी करणे आवश्यक होते. महाराष्ट्रात सहस्रो बांगलादेशी घुसखोर सापडणे, हा प्रशासन, पोलीस आणि सरकार यांसाठी मोठी नाचक्कीच आहे. सरकारी कर्मचारी खासगी क्षेत्राच्या तुलनेत चांगले वेतन घेतात; मात्र त्या तुलनेत नागरिकांना चांगली सुविधा देण्याचे आणि काम प्रामाणिकपणे करण्याचे दायित्व पार पाडत नसतील, तर असे कर्मचारी अन् अधिकारी पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे, असे म्हणायला मुळीच हरकत नाही. प्रशासकीय व्यवस्थेतील सर्वच अधिकारी आणि कर्मचारी भ्रष्ट अन् अकार्यक्षम आहेत, असे नाही; परंतु या कामकाजाच्या साखळीत काही जण असे असले, तरी त्याचा परिणाम व्यवस्थेवर होतो. सरकारच्या एकूण व्ययातील ४० टक्क्यांहून अधिक व्यय हा सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होतो. अशा वर्गाकडून कामकाजामध्ये भ्रष्टाचार होणे, हे निश्चितच दुर्लक्षित करण्यासारखे नाही. सरकार आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनी याविषयी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. काही मासांपूर्वी महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने प्रत्येक शासकीय विभागांच्या कार्यालयांसाठी १०० दिवसांचे कामकाज निश्चित केले. हा उपक्रम यशस्वी झाल्यावर याचा कालावधी वाढवण्यात आला आहे. प्रशासनाला कार्यक्षम करण्याच्या दिशेने हे एक चांगले पाऊल ठरले आहे. याच प्रकारे प्रशासनातील भ्रष्टाचार न्यून करण्यासाठी आणि प्रामाणिकपणा वृद्धींगत होण्यासाठीही अधिकारी अन् कर्मचारी यांना नैतिकतेचे शिक्षण देणेही आवश्यक ठरेल!

'जेन झी'कडे भाजपचे नेतृत्व

बिहारमधील राजकीय घडामोडींची खडानखडा माहिती असणाऱ्या नितीन नबीन यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जगातील सर्वाधिक सदस्य असलेल्या भाजपला आता दक्षिणायन करून तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी आणि पश्चिम बंगाल पादाक्रांत करायचा आहे. अर्थात मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या छत्रछायेखाली कारभार चालणार असल्यामुळे त्यांना ताण घेण्याचे काहीच कारण नाही. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरोधात जेन झीने आवाज उठवण्याचे आवाहन केले होते. जगभर आता जेन झी क्रांतीची मशाल हाती घेत असताना भारतातही तसे व्हावे, अशी राहुल यांची इच्छा असली, तरी राहुल यांच्या पक्षाची धुरा अजूनही ज्येष्ठांच्या हातात आहे. निवडणूक जिंकून द्यायला युवक आणि पदे मात्र ज्येष्ठांना, यामुळे तर काँग्रेसला कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये फटका बसला. यालट, सत्तेतील महत्त्वाची पदे भाजपची ज्येष्ठ मंडळी भूषवत असली, तरी संघटनात्मक तसेच अन्य पदांवर युवक आणि मध्यमवयीन नेत्यांची वर्णी लावून भाजपने संतुलन साधले. आता मोदी हेही जेन झीला आकर्षित करत आहेत. पश्चिम बंगालमधील त्यांचे भाषण ऐकल्यास त्यात त्यांनी युवकांच्या भावनांना हात घातलेला दिसतो. दिल्लीत मोदी यांच्याविषयी आयोजित पुस्तक प्रदर्शनामागेही जेन झीच्या भावनांचा उद्रेक न होता ते आपल्याबरोबर कसे राहतील, ही व्यूहनीती होती. आता त्याचे पुढचे पाऊल म्हणून जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाची धुरा ४५ वर्षांच्या नितीन नबीन यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेली बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदलाचे संकेत देते. नबीन यांना नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय केवळ एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय नाही, तर राष्ट्रीय राजकारणाला एक स्पष्ट संदेशदेखील देतो. भाजपमध्ये नेतृत्वाचा मार्ग वय किंवा वंशावळीने नव्हे, तर कठोर परिश्रम, ऊर्जा आणि संघटनात्मक क्षमतेने ठरवला जातो, हा या निवडीमागील संदेश आहे. केवळ ४५ वर्षांच्या नबीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवून पक्षाने सिद्ध केले आहे, की भाजप भविष्यातील राजकारणावर लक्ष ठेवून तरुण नेतृत्व जोपासते. दुसरीकडे, काँग्रेसचे नेतृत्व ८३ वर्षीय मल्लिकार्जुन खरगे यांच्या खांद्यावर आहे. नबीन यांची नियुक्ती ही केवळ एक नियुक्ती नाही, तर पक्षामध्ये पिढ्यानपिढ्या होणाऱ्या बदलांचे प्रतीक आहे. १९८० मध्ये स्थापनेपासून, पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि कुशाभाऊ ठाकरे यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपला वैचारिक आणि संघटनात्मक पाया मजबूत केला. त्यांच्यापाठोपाठ, नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, व्यंकय्या नायडू, अरुण जेटली, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा आणि अमित शहा यांच्यासह दुसऱ्या पिढीने, तर धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, प्रल्हाद जोशी आणि अनुराग ठाकूर यांच्यासह तिसऱ्या पिढीने पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विस्तार केला आणि पक्षाला सत्तेत आणले. आता चौथी पिढी म्हणून भाजपने नबीन यांची निवड केली आहे. नबीन हे भाजपचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यापूर्वी अमित शहा यांनी ४९व्या वर्षी पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्यापूर्वी नितीन गडकरी ५२व्या वर्षी अध्यक्ष झाले होते. ताज्या निवडीने भाजपने तरुणांना थेट संदेश दिला आहे, की वय हा पक्षात अडथळा नाही. नबीन हे कायस्थ समुदायातून येतात. त्यांची संख्या निवडणुकीच्या राजकारणात निर्णायक मानली जात नाही. असे असूनही, त्यांना पक्षाच्या सर्वोच्च पदावर नियुक्त केल्याने दिसून येते, की भाजप नेतृत्व निवडीमध्ये जातीच्या अंकगणितापेक्षा संघटनात्मक क्षमता आणि राजकीय समजुतीला प्राधान्य देत आहे. संघटनेत काम करणारा, जमिनीशी जोडणारा आणि निवडणूक आव्हाने समजून घेणारा कार्यकर्ता वरच्या स्थानी पोहोचू शकतो. प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टिकोनातून नबीन यांची निवड महत्त्वाची आहे. ते बिहारचे आहेत आणि भाजपचे पूर्व भारतातून येणारे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यावरून स्पष्ट होते, की पक्षाचे लक्ष हिंदी पट्ट्यापुरते किंवा पश्चिम भारतापुरते मर्यादित नाही. भाजप बिहार, बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करू इच्छित आहे. नबीन यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ तीन वर्षांचा आहे, परंतु २०२९ च्या लोकसभा निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील हे निश्चित आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२७ जानेवारी २०२६ ते २ फेब्रुवारी २०२६

सायबर गुन्हेगारांचा नवा डाव मोबाईलमधील ॲपमुळे १० लाखांची लूट, बँक नोटिफिकेशनही बंद

मुंबई । डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही अधिक धोकादायक होत चालले आहेत. गोरेगावमध्ये घडलेल्या एका प्रकरणाने मोबाईल आणि ऑनलाईन बँकिंग सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. एका नामांकित उद्योगपतीचा मोबाईल हॅक करून सायबर भामट्यांनी थेट त्यांच्या बँक खात्यातून ९ लाख ७१ हजार ३८० रुपये लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, इतकी मोठी रक्कम खात्यातून काढली गेली तरी पीडिताच्या मोबाईलवर कोणताही ओटीपी, एसएमएस किंवा ई-मेल अलर्ट आला नव्हता. गोरेगाव पश्चिमेकडील वसंत गॅलेक्सी सोसायटीत राहणारे ५३ वर्षीय दीपक विश्वंभरलाल बघेरिया हे केमिकल मॅन्युफॅक्चरिंग व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ही फसवणूक झाली होती. मात्र, जानेवारी महिन्यात बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. २ जानेवारी रोजी खात्याचा तपशील पाहताच २१ डिसेंबर रोजी तीन वेगवेगळ्या व्यवहारांतून जवळपास दहा लाख रुपये खात्यातून काढले गेल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, व्यवहाराच्या वेळी बँकेकडून येणारे नेहमीचे अलर्ट पूर्णपणे बंद झाले होते. त्यामुळे संशय अधिक गडद झाला. याबाबत दीपक यांनी बँक शाखेत चौकशी केली असता, रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँकेतील वेगवेगळ्या खात्यांमध्ये पाठवली असल्याची माहिती समोर आली. यानंतर त्यांनी सायबर एक्सपर्ट असलेल्या आपल्या भावाची मदत घेतली. मोबाईलमध्ये भारत सरकारचे अधिकृत 'm-Kavach 2' सिक्युरिटी ॲप डाउनलोड करून फोन स्कॅन करण्यात आला. स्कॅनिंगदरम्यान मोबाईलमध्ये 'RTO Challan.apk' नावाची संशयास्पद फाइल सक्रिय असल्याचे आढळून आले. ही फाइल वापरकर्त्याच्या नकळत इन्स्टॉल झाली होती. तपासात असे समोर आले की, या फाइलमुळे मोबाईलचा संपूर्ण रिमोट ॲक्सेस सायबर भामट्यांच्या हाती गेला होता. याच माध्यमातून बँकिंग ॲपची माहिती चोरण्यात आली आणि बँककडून येणारे सर्व अलर्ट मेसेज ब्लॉक करण्यात आले. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, ही घातक लिंक १६ डिसेंबर रोजी दीपक यांच्या एका जुन्या क्लायंटच्या व्हॉट्सॲप अकाउंटवरून पाठवण्यात आली होती. संबंधित क्लायंटचा व्हॉट्सॲप अकाउंट आधीच हॅक करण्यात आला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. लिंकवर क्लिक केल्यानंतरच संपूर्ण फसवणुकीचा मार्ग मोकळा झाला. कामानिमित्त गुजरातमधील वापी येथे असल्याने दीपक यांना तात्काळ तक्रार देता आली नव्हती. मुंबईत परतल्यानंतर त्यांनी सर्व डिजिटल पुराव्यांसह पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून संबंधित बँक खाती, मोबाईल ॲप्स आणि सायबर ट्रेलच्या आधारे तपास सुरु केले. पुराव्यांसह त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

अर्बन कंपनीच्या मसाज थेरपिस्टकडून महिलेला मारहाण

बुकिंग रद्द केल्याने संतप्त, मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

बीड। मुंबईतील वडाळा परिसरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बुकिंग रद्द केल्याच्या कारणावरुन अर्बन कंपनी ॲपच्या माध्यमातून बोलावलेल्या मसाज थेरपिस्टने एका महिलेला मारहाण केली आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करून तपास सुरू केला आहे.

नेमकी घटना काय ?

४६ वर्षीय पीडित महिला वडाळा येथे आपल्या मुलासोबत राहते. तिने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, 'फ्रोजन शोल्डर'च्या उपचारासाठी तिने अर्बन कंपनीद्वारे मसाज सेवा बुक केली होती. ठरलेल्या वेळेनुसार एक महिला थेरपिस्ट त्यांच्या घरी पोहोचली. मात्र, त्या थेरपिस्टची वागणूक आणि ती सोबत घेऊन आलेला मोठा मसाज बेड पाहून पीडित महिला अस्वस्थ झाली. यामुळे पीडितेने बुकिंग रद्द करण्याचा निर्णय घेतला.



...म्हणून केली मारहाण

पीडितेने मसाज सेशन रद्द करुन रिफंड प्रक्रिया सुरु केल्याने थेरपिस्ट संतापली. तिने पीडित महिलेला शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. पीडितेने केलेल्या आरोपानुसार, थेरपिस्टने तिचे केस ओढले, तोंडावर बुक्के मारले, अंगावर ओरखडे ओढले आणि तिला जमिनीवर ढकलून दिले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या मुलालाही थेरपिस्टने धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लहान मुलांना मोकळे सोडू नका, पुणे पोलिसांनी दिल्या अजब सूचना

मुंबई । पुणे पोलिसांनी शहरातील नागरिकांना पाळीव प्राण्यांना, लहान मुलांना सोसायटीच्या गेट जवळ मोकळे सोडू नका याशिवाय फुटपाथवर शिस्तबद्ध उभे राहून टाळ्या वाजवू शकता अशा अजब सूचना दिल्या आहेत. या सूचना वाचून तुम्हालाही प्रश्न पडलाच असेल की हे कशासाठी. तर, पुण्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय ह्यपुणे ग्रँड चॅलेंज टूरह्ण सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी शहरातील नागरिकांसाठी विशेष सूचना आणि नियमावली जारी केली आहे. या सूचना देण्यामागचं कारण म्हणजे ही स्पर्धा सुरळीत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी हे आहे. यासाठी डेक्कन पोलिस ठाण्याच्या वतीने नागरिकांना काही अजब, मात्र सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय आज पुण्यामधील सर्व शाळा दुपारच्या सत्रात बंद ठेवण्यात आल्या आहेत.



काय म्हणाले पोलीस?

पोलिसांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, लहान मुले आणि पाळीव प्राणी यांना रस्त्यावर किंवा सोसायटीच्या गेटजवळ मोकळे सोडू नये. कारण स्पर्धेत भाग घेतलेले सायकलस्वार मोठ्या वेगाने स्पर्धेत सहभागी होतात. त्याच्या सायकलच्या समोर येऊन कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी या सूचना देण्यात आली आहे. तसेच, सोसायटीतील रहिवाशांनी वाहतूक बदलांचा विचार करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही पोलिसांनी नमूद केले आहे.

स्पर्धा बघायला येणाऱ्या नागरिकांसाठीही सूचना

स्पर्धा पाहण्यासाठीही अनेक नागरिक गर्दी करत आहेत. आंतरराष्ट्रीय स्थरावरून स्पर्धक या स्पर्धेत आलेले आहेत. त्यांना बघायला उत्सुक असलेल्या नागरिकांसाठीही पोलिसांनी मार्गदर्शन केले आहे. नागरिकांनी फुटपाथवर शिस्तबद्ध पद्धतीने उभे राहावे, रस्त्यावर उतरू नये आणि स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी टाळ्या वाजवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारची गर्दी, गोंधळ किंवा नियमभंग होऊ नये, यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क आहे.

दरम्यान, या स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी आणि खासगी शाळा आज दुपारी 12 नंतर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी हे निर्देश दिले आहेत. बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर स्पर्धा होणार असल्याने वाहतूक कोंडी आणि विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करत, नियमांचे पालन केल्यास ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा यशस्वी आणि सुरक्षितपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

मुलगा नपुंसक असल्याचं लपवून लग्न लावून दिलं अन् नंतर सुनेला... महाराष्ट्राला हादरवणारा प्रकार

नपुंसकत्व म्हणजे काय?

नपुंसकत्व हे भारतीय समाजामध्ये फारश्या न बोलल्या जाणाऱ्या लैंगिक समस्यांपैकी एक आहे. नपुंसकत्व ही वैद्यकीय समस्या आहे. ही अडचण असलेल्या पुरुषांना लैंगिक संबंध ठेवण्यासाठी पुरेशी उत्तेजना मिळत नाही. किंवा ते पुरेसे उत्तेजित होऊ शकत नाही किंवा ते उत्तेजन टिकवता येत नाही. अशा व्यक्तींना शरीरसंबंध ठेवताना अडचण येते. या साऱ्यालाच मराठीत 'नपुंसकता' किंवा 'लैंगिक अक्षमता' असेही म्हणतात.

मुंबई । लग्न ठरवताना सर्व गोष्टींची काळजी घेतली पाहिजे असं आपण अनेकदा ऐकतो. गावाकडेही सोयरीक जुळवताना सगळ्या गोष्टींची शहानिशा करुन घ्यावी असं सांगितलं जातं. मात्र लग्न ठरवताना मुलाकडून किंवा मुलीच्या घरच्यांकडूनच एखादी गोष्ट जाणूनबुजून लपवण्यात आली तर? असे अनेक प्रकार आपण यापूर्वी ऐकले असतील किंवा त्याबद्दल वाचलंही असेल. मात्र मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगरमध्ये घडलेल्या एका विचित्र प्रकरणामध्ये मुलाच्या घरच्यांनी लपवून ठेवलेलं त्याच्या लैंगिकतेसंदर्भातील सत्य समोर आल्यानंतर सूनेलाच मारहाण करण्यात आली आहे. हे प्रकरण आता पोलीस स्टेशनपर्यंत पोहचलं असून या प्रकरणाची पंचक्रोशीत चर्चा असल्याचं दिसत आहे.



तिनेच कंटाळून पोलीस स्टेशनमध्ये घेतील धाव

मिळालेल्या माहितीनुसार, मुलाचं नपुंसकत्व लपवून लग्न लावल्याचा आणि त्यानंतर पैशांसाठी विवाहितेचा छळ केल्याचा हा प्रकार छत्रपती संभाजी नगरात समोर आला आहे. सदर प्रकरणामधील पीडिता ३२ वर्षांची आहे. सासरच्या मंडळींने फसवणूक केल्यानंतर अत्याचार सुरु केल्याने या पीडित विवाहितेने छावणी पोलीस ठाण्यात धाव घेत पतीसह सासरच्या दहा जणांविरोधात तक्रार दाखल केली आहे. पत्नीने डॉक्टरांकडे जाण्याची मागणी केल्यानंतर पतीकडून मारहाण आणि मानसिक छळ केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

नाशिकमध्ये फ्लॅट घेण्यासाठी मागितले १५ लाख

सासरच्या मंडळींना पतीच्या नपुंसकत्वाची माहिती असूनही पीडितेला गप्प राहण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. आपल्या मुलातील दोष लपवून फसवून मुलीचं लग्न लावून दिल्यानंतर तिच्याकडे हुंडाही मागण्यात आल्याचं आरोपामध्ये म्हटलं आहे. नाशिक येथे फ्लॅट खरेदीसाठी १५ लाख रुपयांची मागणी पीडितेकडे करण्यात आली. पैसे देण्यासाठी सारच्या मंडळींकडून तिच्यावर वारंवार दबावही टाकण्यात आला. या प्रकरणी छावणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

स्कूल व्हॅनमध्ये ४ वर्षीय चिमुकलीचा विनयभंग

बदलापुर। बदलापुरात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्री-प्रायमरीत शिक्षण घेणाऱ्या अवघ्या चार वर्षाच्या चिमुकलीसोबत स्कूल व्हॅनच्या चालकाने कथितरित्या छेडछाड केल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी तक्रार दाखल होताच स्थानिक पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी व्हॅन चालकाला अटक केली असून संबंधित स्कूल व्हॅन जप्त करण्यात आली आहे.



ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) घडली. दुपारी साडेबारा वाजता नेहमीप्रमाणे मुलगी घरी न पोहोचल्याने कुटुंबीयांमध्ये एकच खळबळ उडाली. जवळपास एक तासाच्या उशिरानंतर मुलगी घरी आली. घरच्यांनी विचारपूस केली असता सुरुवातीला ती काहीच बोलली नाही. मात्र ती घाबरलेली असल्याचे लक्षात आल्यानंतर वारंवार विचारल्यावर तिने स्कूल व्हॅन चालकाने आपल्यासोबत चुकीची हरकत केल्याचे सांगितले.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या कुटुंबीयांनी प्रथम शाळा व्यवस्थापनाकडे तक्रार केली आणि त्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पोलिसांनी तत्काळ आरोपीला ताब्यात घेतले. घटनेची माहिती पसरताच परिसरात संतापाची लाट उसळली. संतप्त नागरिकांनी संबंधित स्कूल व्हॅनची तोडफोडही केली.

बदलापूर अत्याचार प्रकरणाची बालहक्क आयोगाकडून दखल

बदलापूर। बदलापूरच्या प्री स्कूल मध्ये शिकणाऱ्या चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार घटनेत बदलापूर पुन्हा एकदा हादरला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल राज्य बालहक्क आयोगाच्या सचिवांनी घेतली असून या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला घेऊन शासनाला अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले. शुक्रवारी बाल हक्क आयोगाच्या सचिवांनी बदलापूरात येऊन पोलीस तसेच शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. ही घटना एका प्री स्कूलशी संबंधित असून कोणतही प्री स्कूल शासनाच्या अखत्यारीत येत नसल्याचे बाल हक्क आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांनी सांगितले. या घटनेबाबत बाल हक्क आयोग शासनास अहवाल सादर करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले, तर बदलापुरात दहा अनधिकृत शाळा असून त्यातील तीन शाळा बंद करण्यात आल्या असून इतर शाळांना नोटीस बजावण्यात आल्या असल्याचे गटशिक्षण अधिकारी विशाल पोतेकर यांनी सांगितले. कोणतीही प्री स्कुल शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत नसल्याने प्री स्कूल बाबत निर्णय घेण्याचा अधिकार आम्हाला नसल्याचेही त्यांनी सांगितले.त्यामुळे आता या प्री स्कूल मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा बाबत शासन काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, बदलापूर शहरात अनेक विद्यार्थी हे प्री स्कूलमध्ये शिकत असून या प्री स्कूल शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत आणाव्यात अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करणार असल्याचे राष्ट्रवादीच्या संगीता चेंदवणकर यांनी सांगितले.

हार्बर मार्गावर पुन्हा एसी लोकल

प्रजासत्ताक दिनापासून प्रवाशांना मिळणार 'कूल' प्रवासाचा अनुभव

मुंबई, मुंबईकर लोकल प्रवाशांसाठी दिलासादायक अपडेट समोर आली आहे. मध्य रेल्वेने २६ जानेवारीपासून हार्बर मार्गावर पुन्हा एकदा एसी लोकल सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यासोबतच पश्चिम रेल्वेवरही एसी लोकलच्या अतिरिक्त फेऱ्या वाढवण्यात येणार आहेत. त्यामुळे दररोजच्या प्रवासात प्रवाशांना अधिक आरामदायी सुविधा मिळणार आहेत. रेल्वेच्या नव्या नियोजनानुसार प्रजासत्ताक दिनापासून सीएसएमटी, वडाळा रोड ते पनवेल या हार्बर मार्गावर एकूण १४ एसी लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. यासाठी काही निवडक वेळच्या सामान्य लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार असून, त्या वेळेत एसी लोकल धावतील. गर्दीच्या वेळेत होणारे हे बदल लक्षात घेता प्रवाशांना वेळापत्रक तपासून प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हार्बर मार्गावर यापूर्वी १ डिसेंबर २०२१ रोजी एसी लोकलची सुरुवात करण्यात आली होती. मात्र सामान्य लोकलच्या तुलनेत एसी लोकलचे तिकीट आणि पास महाग असल्याने प्रवाशांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नव्हता. यामुळे काही काळासाठी हार्बर मार्गावरील एसी लोकल सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली होती. आता नव्या वेळापत्रकासह आणि मर्यादित फेऱ्यांद्वारे पुन्हा ही सेवा सुरू करण्यात येत आहे.

या निर्णयामुळे हार्बर आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील प्रवाशांना अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि वातानुकूलित प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार असून, दैनंदिन प्रवासात मोठा दिलासा मिळणार आहे.



एसी लोकलचं वेळापत्रक (सीएमएमटीच्या दिशेने)

- सकाळी ०४.१५ वा. वाशी ते वडाळा
- सकाळी ०६.१७ वा. पनवेल ते सीएमएमटी
- सकाळी ०९.०९ वा. पनवेल ते सीएमएमटी
- दु. १२.०३ वा. पनवेल ते वडाळा
- दु. ०२.३१ वा. पनवेल ते सीएमएमटी
- दु. ०४.५५ वा. वाशी ते वडाळा
- सायं. ०६.३७ वा. पनवेल ते सीएमएमटी

एसी लोकलचं वेळापत्रक (पनवेलच्या दिशेने)

- दु. ०१.१७ वा. वडाळा ते पनवेल
- दु. ०३.५४ वा. सीएमएमटी ते वाशी
- सायं. ०५.०६ वा. वडाळा ते पनवेल
- सायं. ०५.३० वा. वडाळा ते पनवेल
- रात्री ०७.४० वा. सीएमएमटी ते पनवेल
- रात्री ०८.२३ वा. सीएमएमटी ते पनवेल
- रात्री १०.३४ वा. सीएमएमटी ते पनवेल

डोंबिवलीत मराठी-अमराठी मुद्दा तापला

पोलिसांकडून लाठीचार्ज, नेमकं काय घडलं?

आतापर्यंत या प्रकरणात काय घडलं?

तरुणीची ही व्यथा सोशल मीडियावर व्हायरल होताच राज ठाकरे यांनी या प्रकरणाची दखल घेतली. त्यांनंत मनसे नेते अविनाश जाधवांनी या तरुणीची भेट घेतली आणि तिला धीर दिला. "राज साहेब स्वतः महापालिका आयुक्तांशी बोलतील आणि तुला न्याय मिळवून देतील," असे आश्वासन जाधवांनी तरुणीला दिले आहे. दरम्यान, यावेळी अविनाश जाधवांनी मनसे स्टाईल इशारा दिला आहे. "तुझी गाडी इथेच लाव, आम्ही बघतो कोण येतंय ते," असे म्हणत मनसेने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे.



डोंबिवली। डोंबिवली रेल्वे स्टेशन परिसरात मराठी तरुणी एकता सावंत हिच्या स्टॉलवर केडीएमसीने केलेल्या कारवाईनंतर आता हे प्रकरण थेट 'राज'दरबारी पोहोचले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तातडीने दखल घेतली असून मनसे नेते अविनाश जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

नेमकं प्रकरण काय आहे?

डोंबिवली स्टेशनबाहेर एकता सावंत ही मराठी तरुणी आपला फूड स्टॉल चालवून उदरनिर्वाह करते. मात्र, महापालिकेने तिच्या स्टॉलवर कारवाई करत तो हटवला. यावेळी स्टेशन परिसरात मोठी गर्दी झाली होती आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. यामुळे वातावरण अधिकच तापले.

एकता सावंत यांनी केले खळबळजनक आरोप

माध्यमांशी संवाद साधताना आणि अविनाश जाधव यांच्यासमोर आपली व्यथा मांडताना एकताने प्रशासनातील भ्रष्टाचाराचा पाढाच वाचला. या परिसरात परप्रांतीय फेरीवाल्यांचे वर्चस्व असून, स्टॉल चालवण्यासाठी दररोज ३०० रुपये हप्ता घेतला जातो, असा खळबळजनक दावा तिने केला. "हा हप्ता पोलीस, केडीएमसी आणि जागेचे मालक या सर्वांकडे जातो," असाही आरोप तिने केला आहे.

मराठी तरुणीवर अन्याय

"सण-उत्सवाच्या काळात माझा धंदा बंद पाडला जातो, मात्र परप्रांतीय फेरीवाल्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. उलट, ते लोक माज्यावर हसतात", असे तिने रडत रडत सांगितले.

राज ठाकरेंच्या फोटोची मागणी

"मला इथेच हक्काची टपरी मिळवून द्या आणि त्यावर मला राज साहेबांचा फोटो लावायचा आहे," अशी मागणी तरुणीने केली आहे.



पश्चिम रेल्वेच्या नवीन वेळापत्रकाचा 'लोकल'च्या प्रवाशांना फटका

पालघर। पश्चिम रेल्वेने उपनगरीय क्षेत्रासाठी १ जानेवारीपासून अमलात आणलेल्या नवीन वेळापत्रकात बहुतांश उपनगरीय गाड्यांची वेळ पूर्वीच्या वेळापत्रकाच्या तुलनेने पाच ते दहा मिनिटे अगोदर करण्यात आले होते. मात्र दैनंदिन प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या अनेक गाड्या विलंबाने धावत असल्याने प्रवाशांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे.

पश्चिम रेल्वेच्या नवीन वेळापत्रकात अनेक गाड्यांच्या वेळा बदलण्यात आल्या असून बहुतांश गाड्या या पूर्वीच्या वेळापत्रकाच्या तुलनेत काही मिनिटे लवकर धावत आहेत. बोरिवली व विरार येथे फलाट व रेल्वे रुळांच्या जोडणीचे काम या विलंबामागचे कारण असल्याचे स्थानीय रेल्वे अधिकारी सांगत असले तरी नवीन वेळापत्रकाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने प्रवाशांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com